# निविदा अर्ज

मिळकतीचे वर्णन : स्वारगेट कम. इमारत क्र. १, शंकरशेठ रोड, पुणे ४२ येथील इमारतीमधील तळ मजला

एकुण क्षेत्रफळ : ४,४८७ चौ.फुट जागा

अर्जाची किंमत : ४,९५६/— रूपये (जीएसटीसह)

अर्जाची किंमत भरल्याचा चलन क्रमांक : दिनांक :

निविदाधारकाचा तपशिल :

१) अर्जदार संस्था/सरकारी/निमसरकारी संस्थेचे संपुर्ण नाव :

२) अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :

३) मोबाईल क्रमांक :

४) अर्जदाराचा राहण्याचा संपुर्ण पत्ता :

५) संस्था असल्यास स्वरूप : खाजगी/सरकारी/निमसरकारी/वैयक्तिक

६) संस्था कायदेशिररित्या नोंदविलेली असल्यास नोंदणी क्र. : दिनांक:

७) सदरील मिळकतीचा प्रस्तावित वापर :

८) परिवहन महामंडळाने निर्धारित केलेले मासिक भाडे : २,०३,१७१/—( अक्षरी दोन लाख तीन हजार एकशे एक्काहत्तर रू. फक्त ) (म.न.पा. व इतर कर वगळुन)

९) सदरची निविदा बी/२ पद्धतीने भरण्यात यावी.

निविदा अर्जासोबत जोडलेल्या अटी व शर्ती मी/ आम्ही वाचलेल्या असुन त्या मला / आम्हाला मान्य आहेत.

संस्थेचे सिल अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ : पुणे

दिनांक :

## “अ” लिफाफा आवश्यक कागदपत्रे :—

१) संस्था असल्यास चालविण्याचे प्रमाणपत्र

२) निविदाधारकाचे कुटुंबिय पुणे महानगरपालिकेमध्ये असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील माहितीचे प्रतिज्ञापत्र

३) बयाना रक्कम एफ.डी.आर. व्दारे भरणे आवश्यक एफ.डी.आर ची स्कॅन केलेली प्रत अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच ऑफलाईन निविदाधारकांनी बयाना रक्कमेचा एफ.डी.आर. अर्जासोबत जोडावयाचा आहे.

४) संस्थेच्या / स्वत: च्या मालमत्तेचे मालमत्ता पत्रक/७/१२ पत्रक

## “ब” लिफाफा— निविदेतील दर

१) निविदेमध्ये भरावयाचे निव्वळ मासिक भाडे रक्कम रू. : ............(अक्षरी रू. ................ .....) (म.न.पा. व इतर कर वगळुन)

२) भरलेल्या बयाणा रक्कमेचा तपशिल : रक्कम :७०,०००/— (अक्षरी रू. सत्तर हजार फक्त)

३) चलन क्र. : दिनांक :

संस्थेचे सिल अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ : पुणे

दिनांक :

**प्रतिज्ञापत्र**

सुधारित निविदा कार्यप्रणाली कलम २:१:२ नुसार निविदाधारकाने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्रक सुधारित निविदा कार्यप्रणाली आदेश क्र. द/६७५ दि. २९/०३/२०११ चे कलम २:१ अंतर्गत निविदापुर्व तपासणी कलम २:१:२ नुसार पुणे परिवहन महामंडळाच्या सेवेमध्ये किंवा अन्य पदावर कार्यरत असलेल्या व्यक्ती संदर्भातील आवश्यक माहिती खालीलप्रमाणे सादर करीत असुन मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की, मी सादर केलेल्या माहितीमध्ये काही दोष / त्रुटी आढळल्यास त्यास मी स्वत: व्यक्तिश: जबाबदार राहील.

१) निविदाधारकाचे किंवा संस्थेचे नाव : –

२) निविदाधारकाचे कायम राहण्याचा पत्ता : –

३) संस्थेचे कार्यालयाचा पत्ता : –

४) निविदाधारक संस्थेचे नाव :–

(भागीदारी संस्था असल्यास)

५) निविदाधारक व्यक्तिवे नाव :–

६) निविदाधारक नोंदणीकृत वर्ग :–

७) निविदाधारक काम करण्याची नोंदणीकृत क्षमता र. रू. :–

८) निविदाधारक परिवहन महामंडळामध्ये सेवेत

कुटुंबीय सेवेत आहेत का? होय/नाही

अ) असल्यास त्यांचे नाव

आ) सेवेत असलेले खाते/ विभाग

इ) ज्या पदावर कार्यरत आहेत ते पद :–

९) परिवहन महामंडळामध्ये सेवेव्यतिरिक्त अन्य पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तिची माहीती :

निविदाधारकाची स्वाक्षरी व नाव

दिनांक :–

ठिकाण :–

## निविदा अटी व शर्ती

मिळकतीचे वर्णन : स्वारगेट कम.इमारत क्र.१,शंकरशेठ रोड,पुणे ४२ येथील इमारतीमधील तळ मजला एकुण क्षेत्रफळ : ४,४८७ चौ.फुट जागा महामंडळाने निर्धारीत केलेले मासिक भाडे :— २,०३,१७१/— (म.न.पा. व इतर कर वगळुन )

१) सदरची निविदा बी/२ पद्धतीने भरण्यात यावी.

२) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या वरील मिळकती ३ ते ९ वर्षे कालावधीच्या मुदतीकरिता भाडेकराराने विनियोग करणेकरिता जास्तीत जास्त मासिक भाडे रक्कम देऊ करणाऱ्या व्यक्ती / संस्थांकडुन जाहिर निविदा मागविणेत येत आहेत. एकापेक्षा अधिक निविदादारांनी प्रस्तावित केलेली भाडेरक्कम समान असल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहील.

३) निविदादार संस्था असल्यास नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

४) निविदादारास मनपा रजिस्ट्रेशनची अट शिथिल आहे.

५) निविदा मान्यतेनंतर निविदादाराने मिळकतीचा ताबा घेतलेनंतर, पुणे शहरामध्ये मिळकती असलेले कोणत्याही दोन व्यक्ती हमीदार / जामीनदार म्हणुन त्यांचे शपथपत्र करारनामा करण्यापुर्वी आमच्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

६) निविदादाराने दर महिन्याचे दहा तारखेच्या आत जीएसटी टॅक्स सह भाडे रक्कम परिवहन महामंडळाकडे जमा करावयाची आहे. तसे न केल्यास अथवा भाडे थकविल्यास, भाडे रक्कम निविदादाराकडुन तसेच त्यांचे दोन हमीदार/जामीनदार यांचेकडुन वसुल करण्याचा अधिकार परिवहन महामंडळास राहील. याबाबत जामीनदारांच हमीपत्र देणे आवश्यक आहे.

७) निविदाधारकाचे कुटुंबिय पुणे महानरपालिकेमध्ये सेवेत असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील सर्व माहिती निविदाधारकाने प्रतिज्ञापत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय व्यक्तिचे नाव, हुद्दा, निविदाधारकांशी नाते इ. तपशील स्पष्ट नमूद करण्यात यावा.

८) सदर जागेचा वापर हा निविदादार यांना व्यवसायासाठीच करता येईल. तथापि, व्यवसायाच्या स्वरूपाबाबत परिवहन महामंडळास कळविणे बंधनकारक असुन व्यवसायाच्या स्वरूपानुसार आवश्यक असलेल्या मनपाच्या अन्य विभागाच्या अथवा शासकीय निमशासकीय कार्यालयांच्या परवानग्या घेणे निविदादारास बंधनकारक आहे.

९) निविदा भरल्यानंतर पात्र निविदादाराने कोणत्याही कारणास्तव निविदा मागे घेतल्यास निविदा बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) पात्र निविदादारास उपरोक्त मिळकत देणेबाबतचे प्रस्तावास मिळालेल्या प्रशासकिय मान्यतेबाबत निविदादारास कळविलेचे दिनांकापासुन संबंधित निविदादाराने १५ दिवसाचे आत ६ महिन्यांच्या भाडे रक्कमेइतकी रक्कम अनामत म्हणुन आणि कमीत कमी ३ महिन्यांची भाडे रक्कम अगावु भरावी लागेल. तसेच त्यापुढील ७ दिवसांत करारनामा करणे बंधनकारक राहील.

११) निविदादाराने मिळकतीचा ताबा घेताना ताब्याच्या उर्वरीत संपुर्ण कालावधीच्या भाडे रक्कमेचे आगाऊ धनादेश परिवहन महामंडळाकडील मालमत्ता कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.

१२) जागा वापराच्या भाडे कराराची मुदत ३ वर्षे कालावधीची राहील. व पुढील कालावधीसाठी जागा हवी असल्यास दर ३ वर्षांनी १२ टक्के भाडे वाढ करून ९ वर्षापर्यंत जागा भाडेतत्वावर दिली जाईल.

त्याबाबत करावयाच्या भाडे कराराच्या स्टॅम्पपेपर,रजिस्ट्रेशन व मसुदा फी इ. तदषंगिक बाबींचा खर्च हा निविदादारानेच करावयाच्या आहे. ३ वर्षानंतर मुदतवाढ द्यावयाची असल्यांस त्याबाबतचे सर्व अधिकार परिवहन महामंडळाने राखुन ठेवलेले आहेत.

१३) सदरील गाळे/जागामध्ये होणाऱ्या व्यवसायापासून आजुबाजुच्या रहिवाशांना व नागरिकांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव वा त्रास होणार नाही याबाबतची योग्यती दक्षता निविदादारानी घ्यावयाची आहे.

१४) सदर मिळकतीबाबत संपुर्ण मिळकत अथवा त्यांचा कोणताही भाग पोट भाडयाने देता येणार नाही.

१५) सदर जागेचे मुल्य बऱ्याच प्रमाणात कमी होणे याचा किंवा जागेच्या उपयुक्तेस बऱ्याच प्रमाणात नुकसान पोहोचण्याचा ज्यामुळे संभव असेल अशी कोणतीही हानिकारक कृत्ये करता येणार नाहीत.

१६) मिळकत वापराच्या कराराच्या मुदतीत परिवहन महामंडळाकडे सदर मिळकतीबाबत घेतलेले निर्णय निविदाधारकावर बंधनकारक राहतील.

१७) भाडे रक्कमेव्यतिरिक्त इतर शासकीय व निमशासकीय कर, मिळकत कर, जीएसटी टॅक्स इत्यादी संबंधित व्यक्तिने / संस्थेने भरणे बंधनकारक राहील. तसेच मिळकत कर त्वरीत मनपा कडे जमा करावा अन्यथा महामंडळाकडे जमा असलेल्या डिपॉझिट मधुन प्रचलित व्याज दरासह वसुल करण्यात येईल याबाबत निविदादाराचे कोणत्याही तक्रार अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१८) निविदादार यांना सदर करारानुसार काम करावयाचे नसल्यास अथवा करार रद्द करावयाचा असल्यास त्यांनी त्याबाबत परिवहन महामंडळास तीन महिने अगोदर पुर्व सुचना द्यावयाची आहे.

१९) मिळकतीचा ताबा कोणतीही पूर्व सूचना न देता करारनामा मुदतीपुर्वीच सोडुन दिल्यास अथवा नियम बाह्य कृतीमुळे रद्द झाल्यास जमा केलेली अनामत रक्कम व त्यावरील व्याज निविदादारास मागण्याचा अधिकार राहणार नाही.

२०) मिळकतीची संपूर्ण संरक्षणाची व देखभालीची जबाबदारी संबंधीत निविदादारावर राहील.

२१) भाडेकरार कालावधीमध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळास सदर मिळकतीची काही कारणास्तव गरज भासल्यास अथवा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांनी तसे आदेश दिल्यास किंवा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,यांना वाटल्यास निविदादार यांनी सदर मिळकतीमधील त्यांचे सर्व साहित्य चिजवस्तू वगैरे सर्व स्वखर्चाने त्वरीत हलवुन मिळकतीचा खुला ताबा महामंडळाकडे देण्याची व्यवस्था करावयाची आहे.

२२) मिळकतीची किरकोळ देखभाल / दुरूस्ती संबंधित निविदादाराने स्वत: करावयाची आहे. दुरूस्तीसाठी मोठया प्रमाणावर खर्चाची आवश्यकता असल्यास त्याबाबत परिवहन महामंडळामार्फत पाहणी करून पुढील कार्यवाही करणेत येईल.

२३) सदरील मिळकतीसाठी पुरेसा विज पुरवठा व प्रकाश व्यवस्था करणे व त्याची देयके भरणे तसेच पाणी पुरवठा व त्याची देयके भरणे याची जबाबदारी संबंधित निविदादारावर राहील.

२४) जागा वापराच्या कालावधीमध्ये सदरील मिळकतीची देखभाल व दुरूस्ती संबंधित निविदादाराने करावयाची असुन कराराची मुदत संपल्यावर मिळकत सुस्थितीत परिवहन महामंडळाच्या ताब्यात देणे निविदादारावर बंधनकारक आहे. त्याबाबत निविदादारास कोणत्याही प्रकारची हरकत घेता येणार नाही. नुकसान भरपाईची रक्कम परिवहन महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे रक्कम भरणे बंधनकारक राहील.

२५) सदरील मिळकतीची वेळोवेळी तपासणी करण्याचे अधिकार परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना

राहतील व अशा प्रसंगी संबंधित भाडेकरू यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा करता येणार नाही.

२६) निविदा अमान्य झाल्याचे समजल्यानंतर निविदा बयाना रकमेची लेखी मागणी केल्यानंतर ही रक्कम परत देण्याची कार्यवाही तीन महिन्यात करण्यात येईल.

२७) निविदादारास जेवढया मिळकतीचा ताबा मोजमाप करून देण्यात येईल. तेवढयाच जागेचा वापर करता येईल. अतिरिक्त जागा वापरता येणार नाही. तसेच मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा किरकोळ दुरूस्तीचा अंतर्गत बदल परिवहन महामंडळाच्या पुर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

२८) वरील अटी शर्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही अटी शर्तींचा समावेश करारनाम्यामध्ये करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

२९) प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी राखुन ठेवले असुन याबाबत घेतलेल्या निर्णयाची कारणे देणे त्यांचेवर बधंनकारक राहणार नाही.

उपरोक्त वर नमुद केलेल्या स्वारगेट कम.इमारत क्र.१,शंकरशेठ रोड,पुणे ४२ येथील इमारतीमधील तळ मजल्या वरील क्षेत्रफळ ४४८७ चौ. फुट जागा भाडेतत्वावर देण्याच्या निविदेबाबतच्या वरील अ.क्र. १ ते २९ अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचलेल्या असुन समजुन घेतलेल्या आहेत. सदर अटी शर्ती मला बंधनकारक असुन ते मला पुर्णतः मान्य आहेत.

**निविदाधारकाची स्वाक्षरी व नाव**

पुणे दिनांक :—

ठिकाण :—